**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८२/२०१९** **दिनांक ११/१०/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके**, विभाग प्रमुख, कृषिविदया विभाग, ९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे**, नोडल ऑफिसर, कृषिविदया विभाग, ९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव**, तांत्रिक अधिकारी, कृषिविदया विभाग, ८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०५/१०/२०१९ ते ११/१०/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १२/१०/२०१९ सकाळी ८:३० पासून १६/१०/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५/१० | ०६/१० | ०७/१० | ०८/१० | ०९/१० | १०/१० | ११/१० | | १२/१० | १३/१० | १४/१० | १५/१० | १६/१० |
| ०.२ | ०.० | ०.० | २६.२ | ०.४ | ३.० | ०.० | पाऊस (मिमी) | ६० | ५० | ३५ | २० | ० |
| ३१.० | ३०.६ | ३१.० | ३१.५ | ३२.० | ३१.० | ३१.५ | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३३ | ३४ | ३४ | ३४ |
| २२.० | २१.५ | २३.० | २२.५ | २३.० | २२.५ | २२.५ | किमान तापमान (अं.से) | २४ | २५ | २५ | २५ | २५ |
| २ | ४ | ० | ६ | ० | ६ | २ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ७ | ७ | ८ | ७ | ६ |
| ९५ | ९१ | ८८ | ९६ | ९३ | ९१ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९३ | ९२ | ८९ | ८७ | ७४ |
| ७४ | ७३ | ७८ | ७९ | ७४ | ६७ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६६ | ६९ | ७० | ६४ | ४७ |
| १३ | १.७ | १.६ | १.६ | १.५ | १.३ | १.३ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ४ | ५ | ७ | ९ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | ई..पू. | ई..पू. | पू. | पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| २९.८ | ४९९४.१ | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १२ ते १५ ऑक्टोबर, २०१९ दरम्यान काही ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून कमाल तापमानात वाढ संभवते तसेच आकाश मेघाच्छादित राहील. दिनांक ११ ते १७ ऑक्टोबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **दाणे भरणे ते पक्व अवस्था** | • गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निमगरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• पुढील चारही दिवस पाऊसाची शक्यता असल्याने पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची सकाळच्या वेळेस “वैभव” विळ्याच्या सहाय्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करून साठवणी अगोदर २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे. |
| **आंबा** | **पालवी** | • घन लागवड (५ x ५ मी. किंवा ६ x ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये सुरुवातीच्या काळापासून नियमित छाटणी करावी. या मध्ये उंची कमी करणे, फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास छाटणे आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकणे या गोष्टींचा अंतर्भाव करावा. घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी.<br>• पारंपारिक पध्दतीने लागवड केलेल्या आंबा बागेमध्ये जुन्या अनुत्पादित झाडांची मध्य फांदी छाटणी व इतर मध्यम फांद्यांची विरळणी करावी. यामुळे झाडाला जास्त आणि खोलवर सूर्यप्रकाश उपलब्ध होऊन फळधारणेत वाढ होईल.<br>• वाढत्या तापमानामुळे आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासूनसंरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **काजू** | **पालवी** | • वाढत्या तापमानामुळे काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • तापमानात वाढ संभवत असल्याने नारळ बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **सुपारी** | **फळधारण** | • प्राप्त पुर्वानुमानानुसार तापमानात वाढ संभवत असल्याने सुपारी बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका** | **पेरणी** | • रब्बी हंगामासाठी रोपे तयार करण्याकरिता वाफसा स्थितीत जमिनीची मशागत करून ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाण्यांची पेरणी करावी. रोपांची मर रोगापासून संरक्षण करण्याकरीता पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी तसेच थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे.<br>• कलिंगडाची लागवड करण्यास हवामान उत्तम असल्याने जमिनीच्या मशागतीची कामे सुरु करावीत. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | -- | • जनावरांचे वाढत्या उष्णतेपासून योग्य ते संरक्षण करावे.<br>• जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठ्यामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोलीयेथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**